Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

अंक २२वा

जुलै २०२३

## आमचे ध्येय

**अनेक पिढ्यांपासून चालत आलेले दारिद्र्य-चक्र तोडून एकेक व्यक्तीला सक्षम बनविणे**

गेल्या अठरा वर्षांपेक्षा जास्त कालावधीत आम्ही ५,४८,०३९ हून अधिक ग्रामीण भारतीयांचे जीवन प्रभावित करण्यात यशस्वी ठरलो आहोत. संस्थेच्या आनंदो व जागृती प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही शिक्षण, समुदाय विकास, कौशल्य विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन असे विविध उपक्रम राबवीत आहोत.

## विश्वस्त मंडळ

- **श्रीमती विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया** – विश्वस्त
- **श्री. मनोज मुरारका** – विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद** – विश्वस्त
- **श्री. अश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

## रन फॉर एज्युकेशन – लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आंतरराष्ट्रीय आभासी मॅरेथॉन २०२३ – आय रन दे लर्न !

**ग्रामीण भारतातील माध्यमिक शाळेतील ४२ दशलक्ष मुले शाळाबाह्य आहेत ही वस्तुस्थिती आहे.**

या वर्षी १००० मुले पुन्हा शाळेत जावीत यासाठी आम्ही मॅरेथॉनमध्ये धावणार आहोत.

'सर्वांसाठी शिक्षण' हा संदेश पोहोचविण्यासाठी 'रन फॉर एज्युकेशन' या अनोख्या आंतरराष्ट्रीय आभासी मॅरेथॉनमध्ये आमच्यासमवेत भाग घ्या.

ग्रामीण भारतातील मुलांचे शालेय शिक्षण सुरू राहण्यासाठी व शिक्षणाबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रेरित अशा जगभरातील सर्व व्यक्ती आणि धावपटू, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या 'रन फॉर एज्युकेशन' या उपक्रमांतर्गत एकत्र येतील. ही संधी गमावू नका.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या रन फॉर एज्युकेशन अंतर्गत मी धावणार आणि मुले शिकणार. आजच नाव नोंदणी करून या उपक्रमात सहभागी व्हा. दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत कधीही, कुठूनही चालत जा. गोळा केलेली सर्व रक्कम मुलांच्या शिक्षणासाठी दान केली जाईल.

नोंदणी साठी दुवा : https://cyruns.in/lolt/

किंवा क्यू. आर. कोडवर स्कॅन करा.




## मंथन २१ – संस्थेच्या सांस्कृतिक मूल्यांचे सक्षमीकरण






दिनांक २० व २१ जून २०२३ या कालावधीत लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या गट नेत्यांसाठी मुंबई येथे क्षमता बांधणी सत्र आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या **संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रमेश दासवानी, सीओओ श्रीमती कमल दमानिया, आनंदो शैक्षणिक प्रकल्प प्रमुख श्री सुधीरकुमार गजभिये, रिसोर्स मोबिलायझेशन प्रमुख श्रीमती शीला अय्यर, वित्तविभाग प्रमुख श्री मलिक गोब्रानी, विश्वस्त श्री अशदीन डॉक्टर** आणि लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे **मुख्य कार्यकारी अधिकारी श्री प्रदीप कोप्पीकर** यांनी विविध विषयांवरील सत्रे घेतली.

# आम्हाला तुमचा अभिमान वाटतो.



**श्री. वैभव मनवर**

वाशिम जिल्ह्यातील आनंदो प्लस शेलुबाजार केंद्राच्या या विद्यार्थ्याने एम.पी. लॉ कॉलेज, औरंगाबाद येथून बॅचलर ऑफ लेजिस्लेटिव्ह लॉ (LLB) हा अभ्यासक्रम पूर्ण केला असून मास्टर ऑफ लेजिस्लेटिव्ह लॉ (LLM) साठी प्रवेश घेतला आहे. कायद्याची पदवी पूर्ण करणारा तो वाशिम जिल्ह्यातील तिसरा विद्यार्थी आहे. वैभव सध्या औरंगाबाद जिल्हा व सत्र न्यायालयात वकील म्हणून प्रॅक्टिस करत आहे.



**श्रीमती सारिका खुरशिंगे**

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर केंद्रातील आनंदो प्लसच्या या विद्यार्थिनीने कॉम्प्युटर सायन्स मधून बी.ई. पूर्ण केले व २०२० मध्ये परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून रुजू झाली होती. तिला आता सहाय्यक व्यवस्थापक पदावर बढती देण्यात आली आहे. स्त्री शिक्षणाबद्दल फारशी जाणीव जागृती नसलेल्या आदिवासी कुटुंबातून आलेल्या सारीकासाठी अभियंता म्हणून



**श्री सुरज भारसंडे**

जालना जिल्ह्यातील आनंदो प्लस भाटेपुरी केंद्राच्या या विद्यार्थ्याने आयटीआय डिप्लोमा पूर्ण केला. महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्याद्वारे लार्सन अँड टुब्रो संस्थेने त्याची निवड केली आहे.



**श्रीमती निकिता सीताराम माउले**

रायगड जिल्ह्यातील माणगाव केंद्रातील या आनंदो प्लस विद्यार्थिनीची मुंबई पोलीस दलात निवड झाली.



**श्रीमती. गीता कचरे**

जालना तालुक्यातील भाटेपुरी केंद्रातील आनंदो प्लस या विद्यार्थ्याने मुंबई पोलिसात नोकरी मिळवली आहे.



**श्रीमती कोमल भांडारगे**

जालना जिल्ह्यातील मठपिंपळगाव येथील आनंदो प्लसच्या या विद्यार्थिनीने इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनमधील अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली आणि आता तिला व्होडाफोन आयडिया लिमिटेडने अभियंता म्हणून नियुक्त केले आहे.



**श्रीमती. शमा सिद्दिकी**

**श्रीमती शमा सिद्दिकी**, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टमध्ये प्रथमच, जीएस मेडिकल कॉलेज (केईएम) मधून ऑक्युपेशनल थेरपीचे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या कर्जत केंद्रातील आनंदो प्लसच्या या विद्यार्थिनीने पहिल्या वर्षी उत्तम कामगिरी करून महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आणि ती महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात प्रथम आली आहे. क्राफ्ट्समाला आणि श्री सुधाकर रेड्डी यांच्या शिष्यवृत्तीअंतर्गत ती तिचा व्यावसायिक अभ्यास करत आहे.

## कर्जत तालुक्यातील ठोंबारवाडी गावात जलस्त्रोत प्रकल्पांतर्गत विहिरीचे उद्घाटन व लोकार्पण



ठोंबरवाडी येथील २०० ग्रामस्थांना गेल्या २० वर्षांपासून भेडसावत असलेल्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून विहीर बांधण्यात आली. गावापासून २ किलोमीटर अंतरावर, एका स्थानिक कुटुंबाने दिलेल्या जमिनीवर संस्थेच्या माध्यमातून राजकमल बजाज फाउंडेशन सोबत संयुक्तपणे ही विहीर बांधण्यात आली. विहिरीला बारमाही पाण्याचा झरा आहे. विहिरीपासून गावच्या टाकीपर्यंत पाइपलाइन टाकण्यात आली. दिनांक २२ एप्रिल २०२३ रोजी, श्रीमती सीमा बजाज (राजकमल बजाज फाउंडेशन), ग्रामस्थ व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत विहिरीचे उद्घाटन व लोकार्पण केले गेले.



## टॅब्लेट लायब्ररीचे उद्घाटन

वाशिम, कर्जत, यवतमाळ, माणगाव आणि अलिबाग विभागात जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून विद्यार्थ्यांसाठी टॅब्लेट लायब्ररी ही संकल्पना राबविण्यात आली. लाईट ऑफ लाईफच्या लाभार्थींना या डिजिटल शिक्षणिक साधनाचा वापर करून शैक्षणिक ज्ञान वाढविता येईल.



## भागीदार संस्थांची लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कार्यालयास भेट




दिनांक ८ जून २०२३ रोजी, बजाज फायनान्स लिमिटेडचे अध्यक्ष व बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) ग्रुप हेड श्री कुरुश इराणी, श्रीमती लीना राजन - डेप्युटी नॅशनल लीड- CSR - बजाज फिनसर्व्ह, श्रीमती पूजा कांबळे - वरिष्ठ व्यवस्थापक- कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी-बजाज फायनान्स लिमिटेड, आणि बजाज फिनसर्व्हच्या डेप्युटी मॅनेजर श्रीमती सारिका हरके यांनी कर्जतच्या लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट केंद्राला भेट दिली. पाहुण्यांनी आनंदो प्लसचे विद्यार्थी व पालक यांच्याशी संवाद साधला आणि गृहभेटी केल्या. लाभार्थी श्रीमती शुभांगी मोरे यांनी सुरू केलेल्या ऑप्टिकल स्टोअर या उद्योजकीय उपक्रमाला पाहुण्यांनी भेट दिली. विदेशात काम करत असलेला लाभार्थी श्री आदेश देशमुख याच्याशी व्हिडिओ कॉलद्वारे पाहुण्यांनी संवाद साधला. बजाज होल्डिंग्ज अँड इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडने दिलेल्या नियमित पाठिंब्याबद्दल पालक आणि लाभार्थींनी कृतज्ञता व्यक्त केली.

## ऑलकार्गो लॉजिस्टिक पुरस्कृत वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदणे



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जत विभागाच्या पर्यावरण संवर्धन पथकाने जून महिन्यात कर्जत तालुक्यातील २९ गावांमध्ये ६०० नवीन शेतकर्यांना फळझाडांची रोपे वाटपाची पूर्वतयारी म्हणून खड्डा खोदण्याची मोहीम हाती घेतली.

## त्रिशा इन्फोटेक समर्थित संगणक प्रशिक्षण



लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व त्रिशा आय इन्फोटेक यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील डिक्सळ केंद्रात आनंदो प्लसच्या २० लाभार्थ्यांसाठी मूलभूत संगणक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा कालावधी एक महिन्याचा असून त्रिशा इन्फोटेक यांचेकडून हे प्रशिक्षण मोफत देण्यात आले आहे.

## ब्युटीशियन आणि शिवणकाम सेट-अप संचांचे वितरण



लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या आजीविका आणि कौशल्य विकास प्रकल्पांतर्गत दिनांक ५ एप्रिल रोजी, वोडहाउस कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहकार्याने तिवरे, कशेळे आणि धसई केंद्रातील एकूण ३२ लाभार्थ्यांना ब्युटीशियन आणि टेलरिंग सेट-अप संचांचे वाटप करण्यात आले. श्री मनमोहन तिवाना (व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी) आणि वोडहाउस कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेडचे १२ सदस्य यावेळी उपस्थित होते.

## SCF4K चे स्वयंसेवक विद्यार्थी

दिनांक २६ ते दिनांक ३० जून या कालावधीत **SCF4K** च्या सहा सदस्यांनी लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या वरळी केंद्रात स्वयंसेवक म्हणून काम केले. यावेळी या स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच गूगल डॉक्स, पॉवर पॉइंट यासारखी प्रभावी आधुनिक कौशल्ये शिकवली.



## सॅनिटरी नॅपकिनचे वाटप



अल्ट्री फाउंडेशनच्या सहकार्याने लाईट ऑफ लाईफ हेल्थ केअर टीम, कर्जत यांनी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील १४ गावातील ५१२ लाभार्थ्यांसाठी मासिक पाळी आणि मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता या विषयावर जनजागृती सत्र आयोजित केले होते. सत्रानंतर ४३४ लाभार्थ्यांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.



दिनांक २४ मे रोजी, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या माउंटलीटेरा स्कूल इंटरनॅशनल येथील विद्यार्थ्यांनी २५ वंचित मुली व महिलांना सॅनिटरी नॅपकिन्स वाटण्यासाठी पैसे जमा केले. सॅनिटरी नॅपकिन्स वाटपासाठी कर्जतपासून सुमारे २५ कि.मी. अंतरावर असलेल्या मुंडेवाडी या छोट्या गावाची निवड करण्यात आली. मासिक पाळीविषयी जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले व त्यानंतर सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले.

## जागतिक आरोग्य दिन साजरा




कर्जत, अक्कलकुवा, मुरबाड आणि दापोली येथे लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आरोग्य विभागाने दिनांक ७ एप्रिल रोजी कुशिवली, मंदारा, घंटाणी, खरशेत, कुंदाचीवाडी आणि पंचनदी गावातील १४१ लाभार्थ्यांसाठी पोषण विषयक जाणीवजागृती सत्र आयोजित करून जागतिक आरोग्य दिन साजरा केला.

## जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस साजरा





दिनांक २९ आणि ३० मे रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आरोग्य विभागाने लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशनच्या सहकार्याने जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस साजरा केला. या दोन दिवसांच्या सत्रात कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना सामील करून घेण्यात आले होते. सर्वांना समजण्यासाठी मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये सत्राचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठांच्या हस्ते सहभागींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले व कार्यक्रमाचा समारोप झाला. लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशनचे संचालक श्री मधुर गुप्ता आणि संचालिका श्रीमती तुलसी गुप्ता या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# ठळक बातम्या व ताज्या घडामोडी

## जागतिक पर्यावरणदिन साजरा

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, कर्जत येथील पर्यावरण संवर्धन विभागाने, दिनांक ५ जून रोजी खालापूर तालुक्यातील बोरगाव धरणाजवळील चिंचमाळ गावात ३० रोपे लावून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. रोपे लावा, झाडे जगवा आणि वनसंवर्धन करा हा संदेश देण्याचा उद्देशाने हा कार्यक्रम घेण्यात आला.




## लाभार्थींसाठी गायन व तबला वादनाचे उन्हाळी सुट्टीतील वर्ग



उन्हाळी सुट्टीतील कार्यक्रमचा भाग म्हणून अनंत संघाने दिनांक २२ मे ते २७ मे या कालावधीत ५६ विद्यार्थ्यांसाठी गायन आणि तबला प्रशिक्षण वर्ग घेतले. या ६ दिवसांच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गाण्याचे तंत्र व तबला वादनाच्या विविध घटकांची माहिती तसेच शास्त्रीय संगीत आणि घराण्यांची सखोल माहिती घेतली.

## लाईट ऑफ लाईफ संस्थेतील यशस्वी विद्यार्थी

### एस. एस. सी. परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी

१ चेतन केशव चवाण, वाशीम 

२ वेदांत बबन निंबेकर, जालना 

३ कोमल पांडुरंग बोडखे, वाशीम 

४ साक्षी संतोष गोवडे, वाशीम 

५ संजीवनी दिलीप काळे, वाशीम 

### एच. एस. सी. परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी

१ अमूल सेवाराम सारसकर, मध्य प्रदेश 

२ अनमिता गुरीअर, राजस्थान 

३ किरण शंभू रेगर, राजस्थान 

४ योगिता महादेव चौधरी, वाशीम 

५ प्रतिक संदेश मोरे, वाशीम 

## आनंदो प्लसच्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन




लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने रेड डॉट फाउंडेशन सेफसीटी यांच्या सहकार्याने कर्जत विभागातील आनंदो प्लस लाभार्थ्यांसाठी 'स्टँड-अप अगेन्स्ट स्ट्रीट हॅरासमेंट' या प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले होते. श्रीमती प्रगती वैश्य, प्रोग्रॅम आणि आउटरीच अधिकारी, रेड डॉट फाउंडेशन सेफसीटी यांनी लाभार्थ्यांसाठी सत्राचे संचालन केले.

## लाईट ऑफ लाईफ ट्रस्टमध्ये स्वयंसेवकांचे कार्य



२२ मे ते २५ जून दरम्यान, सुश्री इशिता देव या एनएमआयएमएस स्कूल ऑफ डिझाईनच्या विद्यार्थिनीने लाइफ ट्रस्ट, मुख्य कार्यालयात तिची स्वयंसेवा प्रवेश पूर्ण केला. त्या कार्यकाळात तिने आगामी लाइट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय वर्च्युअल मॅरेथॉन आणि सोशल मीडिया पोस्टसाठी क्रिएटिव्ह डिझाइन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



दिनांक ८ मे ते १० जून या कालावधीत, **FLAME** विद्यापीठातील श्रीमती क्रिशा शाह आणि श्रीमती सानिया जैन यांनी लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कफ परेड केंद्रातून इंटर्नशिप पूर्ण केली. या कालावधीत त्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलणे, व्यक्तिमत्व विकास आणि इंग्रजी संवाद इत्यादी कौशल्ये महिला लाभार्थींना शिकविली.

## आगामी उपक्रम




दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट सादर करत आहे – **“जावेद अली – लाइव्ह इन कॉन्सर्ट”** निधी उभारणीसाठी संगीतिका.

**शुक्रवार दिनांक ३ नोव्हेंबर सायंकाळी ७ वाजता**
**टाटा थिएटर, एन.सी.पी.ए. येथे**
बुक माय शो वर पासेस उपलब्ध

## संपर्कासाठी पत्ता :

### मुख्य कार्यालय :

वन बीकेसी, सी विंग, युनिट नंबर : १५१९, प्लॉट नं. : सी–६६,
जी–ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई),
मुंबई – ४०० ०५१ . संपर्क क्र. : +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल : connect@lightoflif

### शाखा कार्यालये :

**महाराष्ट्र :** • अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश :** • सिवनी **राजस्थान :** • बिजोलिया • सिकार
**ओडिशा :** • अंगुल

www.lightoflifetrust.org    +91-9820229445

@LightOfLifeTrustIndia  @lightoflifetrust_lolt  @lightoflifetrst  lightoflifetrust  YouTube youtube.com/c/lightoflifetrust

पेटीएम वरून लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला देणगी देण्यासाठी https://m.paytm.me/LOLT
Contribute Now ! paytm